भुसावळ नगरपरिषद भुसावळ

ता.भुसावळजि.जळगाव

स्वच्छ भारत
एक कदम स्वच्छता की ओर

Phone No.-02582-225403
Toll Free No.-1800 233 5264

Website- www.bhusawalnp.org
Email- BMCBSL1882@GMAIL.COM

जा.क्र./अग्नि/२१९/२०२५ दिनांक - २४ / ०१/२०२५

अग्निशमन नाहरकत प्रमाणपत्र

प्रति,
वैद्यकीय संचालक,
चैतन्य आयुर्वेद धर्मदाय रुग्णालय
जामनेर रोड, भुसावळ जि. जळगाव.

संदर्भ:- अग्निशमन नाहरत प्रमाणपत्र मिळणेकरीता आपला अर्ज क्र. ४८२ दिनांक- १६/०१/२०२५.
व्यवसायाचे नाव :- चैतन्य आयुर्वेद धर्मदाय रुग्णालय
अर्जदाराचे नाव :- डॉ. माणिक पाटील वैद्यकीय संचालक
आपल्या व्यवसायामुळे आजुबाजुला राहणाऱ्यांचे विशेषधिकारांचे हनन होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१) कोणतीही जीवित व वित्तीय हानी झाल्यास जबाबदारी हॉस्पिटल चालकाची राहील.
२) हॉस्पिटल मध्ये आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक यंत्रणा / उपाययोजना फायर ऑडीट नुसार करणे बंधनकारक राहील.
३) आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक यंत्रणा वापरण्याचे / हाताळण्याचे प्रशिक्षण हॉस्पिटल मधील कर्मचार्यांना देण्यात यावी. तसेच अग्निशमन यंत्रणा नेहमी कार्यान्वित असावे.
४) आपातकालीन स्थितीत बाहेर निघण्याचे मार्ग दरवाज्यावर गडद लाल रंगाने लिहणे बंधनकारक राहील.
५) आपातकालीन स्थितीमध्ये संपर्क साधण्यास दर्शनीभागावर नजीकचे पोलीस केंद्र – हॉस्पिटल – रुग्णवाहिका अग्निशमन केंद्राचे फोन क्रमांकांचे फलक लावावे .
६) ज्वलनशील पदार्थ सुरक्षित ठेवण्याची जबाबदारी हॉस्पिटल चालकाची राहील.
७) फायर ऑडीट दर सहा महिन्यांनी (JANUARY & JULY) करून फॉर्म (ब) नगर परिषदेस सादर करण्याची जबाबदारी हॉस्पिटल चालकाची राहील.
८) नियमानुसार घनकचर्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी आपली राहील.
९) आपात्कालीन परीस्थीतीत अग्निशमन विभाग नगर परिषद भुसावळ ला संपर्क साधावा.

सदर प्रमाणपत्र फक्त अग्निशमन उपाययोजने बाबत देण्यात येत आहे, नियमानुसार व्यवसायाकरिता आवश्यक असलेली शासकीय व इतर परवानगी घेण्याची जबाबदारी आपली राहील.
कोणतेही अनियमितता किंवा आक्षेपार्ह बाब निर्देशनास आल्यास नाहरकत प्रमाणपत्र रद्द करण्याचे अधिकार नगर परिषद कडे राखून ठेवले आहेत.

वरील अटीशर्ती व दाखल केलेल्या फायर ऑडीट अहवालास अधीन राहून अग्निशमन विभागाचे तात्पुरते नाहरकत प्रमाणपत्र देण्यात येत आहे.

टीप:- सदर प्रमाणपत्रची वैधता दिनांक २४/०१/२०२५ ते २३/०१/२०२६ पर्यंत राहील

The Bhusawal Municipal Council Bhusawal
भुसावळ नगर परिषद भुसावळ

अग्निशमन अधिकारी
नगर परिषद भुसावळ